सं.फौ.के.नं. २१९/२०२०

नि. क्र. ५०

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०५ चा जबाब**

**नाव** – मालती मारुती जाधव,

**वय**– ७६ वर्षे, **व्यवसाय** –गृहीणी,

**रा.** चाफवली, सरोदेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. वनकर यांचेतर्फे** –

०१. आरोपी क्र.१ माझा मुलगा, आरोपी क्र.२ माझी सुन व आरोपी क्र.३ व ४ माझी मुली आहेत. माझी मुलगी स्वाती वाडीमध्ये राहते. माझा मुलगा रमाकांत रत्नागिरीला राहतो. माझा मुलगा शशिकांत लांजा व रमाकांत रत्नागिरी येथे राहतो. माझा मुलगा चंद्रकांत मयत आहे. फिर्यादीचा पती माझा नातु आहे. त्या दिवशी काय घटना घडली मला माहीती नाही.

(**सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा का.क. १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आणि फौ.प्र.सं.क. १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पध्दतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.**)

०२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ व ४ फिर्यादीला लहान मोठ्या कारणास्तव त्रास द्यायच्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ व ४ यांनी माझ्या नात सुनेला शिव्या दिल्या. साक्षीदाराला टिपणातील रेखांकीत मजकुर वाचुन दाखवण्यात आला. हा मजकुर मी पोलीसांना सांगीतलाच नव्हता. तो माझ्या टिपणात कसा नमुद झाला मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीम. पी. सी. चव्हाण यांनी नाकारला.</u>

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.07.23 17:55:57 +0530

(श्रीमती एस.एच.पाटील)

दिनांक – २२/०७/२०२४

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.